स्थायी समितीच्या गुरुवार दिनांक 10–08–2017 रोजी दुपारी 03–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. संदिप चंद्रभान जाधव | सभापती |
| 2. | श्रीमती संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 3. | श्रीमती रिता अशोक मुळे | सदस्या |
| 4. | श्रीमती उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| 5. | श्रीमती दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |
| 6. | श्रीमती सरला कमलेश नायक | सदस्या |
| 7. | श्रीमती मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| 8. | श्रीमती सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| 9. | श्रीमती लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 10. | श्रीमती जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| 11. | श्री. जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| 12. | श्री. हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| 13. | श्रीमती अंसारी सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन | सदस्या |
| 14. | श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्रीमती भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| 2. | श्रीमती नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. रविन्द्र कुंभारे, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 129:– {आरोग्य विभाग}

महाल रोगनिदान केंद्र येथील फिजिओथेरेपी विभाग साकेत ऑर्थोपेडीक अप्लॉयन्सेस सेंटर, रामदास पेठ, नागपूर यांना दि.३०.६.२०१६ ला झालेल्या करारनाम्यातील म.न.पा.ने नमुद केलेल्या अटी व शर्तीनुसार चालविण्यास देण्यात आले आहे. परंतु मा.महापौर यांचे दि.१६.११.२०१६ च्या पत्राच्या निर्देशानुसार Deep Tissue Laser Therapy machine महाल रोगनिदान केंद्र येथे उपलब्ध

करण्यात आली. महाल रोगनिदान केंद्रे येथे नियमित फिजिओथेरेपीस्ट उपलब्ध नाही. Deep Tissue Laser Therapy machine चा उपचार करताना डोळयाला इजा होण्याची शक्यता नाकारता येत नाही, व उपरोक्त मशिन फिजिओथेरेपीस्ट यांचे मार्गदर्शनाखाली उपयोगात आणावी असे डॉ.सदानंद थोटे फिजिओथेरेपीस्ट, साकेत आर्थ्रोपेडिक अप्लायंसेस सेंटर, रामदासपेठ, नागपूर यांनी सुचविले आहे. महाल रोगनिदान केंद्र येथील फिजिओथेरेपी केंद्र चालविण्याकरीता दि.३०.६.२०१६ ला झालेल्या करारनाम्यातील मुख्य अटी व शर्तीचे अधिन राहुन (अटि क्र.१ ते १८) तसेच Deep Tissue Laser Therapy machine हस्तांतरीत करण्याकरीता खालील नमुद केलेलया अटी व शर्तीना मा.आयुक्त यांनी पृष्ठ क्र. ४७ नुसार मंजुरी प्रदान केली आहे. साकेत ऑर्थोपेडीक अप्लॉयन्सेस सेंटर, रामदास पेठ, नागपूर यांनी म.न.पा.सोबत दि.३०.६.२०१६ ला केलेल्या करारनाम्यानुसार काम करीत आहे व त्यांचेकडे फिजिओथेरेपीस्ट उपलब्ध असल्यामुळे, सदर मशिन म.न.पा.ने नमुद केलेल्या खालील अतिरिक्त अटी व शर्तीनुसार चालविण्याकरीता स्थायी समिती मंजुरी देण्यास्तव विचारात घेवून,

१) Deep Tissue Laser Therapy उपचाराकरीता रुग्णांची नोंदणी महाल रोगनिदान केंद्र येथील बाहय रुग्ण विभागात करण्यात येईल व रुग्णाकडून आकारण्यात आलेले शुल्क महानगरपालिकेकडे जमा करण्यात येईल.

२) जमा झालेल्या एकूण मासिक शुल्कापैकी ५०-५० टक्के शुल्क आरोग्य विभाग, महानगरपालिका व साकेत आर्थ्रोपेडिक अप्लायंसेस सेंटर, रामदासपेठ, नागपूर यांच्यामध्ये विभागण्यात येईल.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन या उपचाराकरिता प्रति रुग्णा कडून रु. 30/– शुल्क आकारण्यांत येईल या विभागाच्या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 130:– नागपुर शहरातील सिमेंट कॉंक्रीट रस्ते,टप्पा –III प्रकल्प {लोककर्म विभाग} अंतर्गत महत्वपूर्ण रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करण्यास्तव स्थायी समिती ठराव क्र. 285 दि. 14.07.2016 अन्वये एकुण 39 रस्ते सिमेंटीकरण करण्याच्या कामाच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तसेच स्थायी समिती ठराव क्र. 705 दि. 05. 11.2016 नुसार विधानसभा क्षेत्रनिहाय एकुण 6 पॅकेजेस तयार करण्याकरिता खालील प्रमाणे मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.

| पॅकेज क्रमांक | विधानसभा क्षेत्र | स्था.स.द्वारा मंजुर यादीतील रस्ते अ.क्रमांक | एकुण रस्ते | एकुण ढोबळ रक्कम (रू.कोटी मध्ये ) |
|---|---|---|---|---|
| 1 | उत्तर नागपुर | 13,14,15,16,17,18, व 19 | 06 | 25.86. |
| 2 | मध्य नागपुर | 1,2,3,4, व 5 | 05 | 22.95 |
| 3 | पूर्व नागपुर | 6,7,8,10, व 11 | 05 | 46.55 |
| 4 | पश्चिम नागपुर | 28,29,30,31,32,33, व 34 | 07 | 57.37 |
| 5 | दक्षिण नागपुर | 20,21,22,23,25,26, व 27 | 07 | 38.00 |
| 6 | दक्षिण – पश्चिम नागपुर | 35,36,37,38,39,40,41,42 व 43 | 09 | 45.97 |
| | | एकुण | 39 | 236.70 |

हया 6 पॅकेजेस नुसार कामाकरिता निविदा बोलविण्यात आल्या व एकुण 4 वेळा निविदेच्या कालावधी वाढवुन देवुन सुध्दा निविदेला प्रतिसाद प्राप्त झाला नाही. त्यामुळे जास्त रक्कमेच्या पॅकेजेस चे दोन भागात विभाजन करून खालील प्रमाणे एकुण 10 पॅकेजेस मध्ये रूपांतर करण्याचे विभागाद्वारे प्रस्तावित आहे.

| पॅकेज क्र. | विधानसभा क्षेत्र | रस्त्याचे क्र. | एकुण रस्ते | तांत्रिक मान्यता प्राप्त रक्कम रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | उत्तर | 13,15,16,17,18,19. | 6 | 25,74,24,092/— |
| 2 | मध्य | 1,2,3,4,5. | 5 | 22,33,20,981/— |
| 3 | पुर्व –1 | 6,10,11. | 3 | 24,12,51,360/— |
| 4 | पुर्व –2 | 7,8. | 2 | 22,04,89,551/— |
| 5 | दक्षिण–1 | 20,23. | 2 | 20,30,29,353/— |
| 6 | दक्षिण–2 | 21,22,25,26,27. | 5 | 19,84,85,375/— |
| 7 | पश्चिम–1 | 28,29,30. | 3 | 29,01,72,103/— |
| 8 | पश्चिम–2 | 31,32,33,34. | 4 | 31,66,79,164/— |
| 9 | दक्षिण – पश्चिम–1 | 35,36,37,43. | 4 | 20,58,99,179/— |
| 10 | दक्षिण – पश्चिम–2 | 38,39,40,41,42. | 5 | 21,61,35,802/— |
| | | एकुण | 39 | 237,28,86,960/— |

1. वरील प्रस्तावित प्रमाणे 10 पॅकेजेस ला सुधारीत मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेवून तसेच,
2. मा.विभागिय आयुक्त, नागपुर विभाग, नागपुर यांचे अध्यक्षतेखाली समिती मार्फत दि. 22.12.2016 रोजीच्या सभेनुसार विधानसभा क्षेत्रानिहाय एकुण 6 पॅकेजेस ला प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. स्थायी समिती कडुन 10 पॅकेजेस च्या प्रस्तावास सुधारीत मंजुरी प्राप्त झाल्यानंतर सदर अहवाल मा. विभागिय आयुक्त, नागपुर विभाग, नागपुर यांचे अध्यक्षतेखाली समिती कडे पुनश्च सुधारीत प्रशासकिय मान्यतेकरिता सादर करावा लागेल व प्रशासकिय मान्यता प्राप्त झाल्यानंतर निविदा बोलविण्याबाबतचा प्रश्न समितीने विचारात घेऊन तांत्रीक कारणामुळे प्रस्तावित केलेल्या रस्त्यांच्या मौका मध्ये बदल करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष स्थायी समिती यांना देण्याच्या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 131ः– {कारखाना विभाग} मा. स्थाई समिती ठराव क्र. 78 दि. 23/06/2017 अन्वये मे. काम अविदा ईन्वायरो ईजिनिअर्स प्रा.लि. पुणे, या निविदाकारा कडुण 01 नग सक्शन कम जेटींग मशिन खरेदी करण्याकरीता प्राकलणीय राशी रु. 56,70,000/- पेक्षा 11.43% टक्के कमी दराणे रु. 50,21,917.88/- राशीचा निविदेस मंजुरी प्रदान केली आहे.

परंतु दि. 01/07/2017 पासुन केंद्र शासनातर्फे वस्तु व सेवा कर हि नवीन अमलात आलेली आहे. सदर करप्रणाली अतंर्गत सक्शन कम जेटींग मशिन करीता 28% टक्के कर आकारण्यात येत असल्यामुळे सदर मशिनची किमंत वाढलेली आहे. त्याअनुषंगाने सक्शन कम जेटींग मशिन च्या किमंतीमध्ये पुढीलप्रमाणे बदल झालेला आहे.

| During Tender Participation | | After GST Implementation | |
|---|---|---|---|
| PARTICULARS | TOTAL RS. | PARTICULARS | TOTAL RS. |
| KAMBI 8 L-C-3H-5-110 | 1933552.20 | KAMBI 8 L-C-3H-5-110 | 1933552.20 |
| Freight | 45000.00 | Freight | 45000.00 |
| FOC items | 603820.00 | FOC items | 603820.00 |

| | | | |
|---|---|---|---|
| VAT @13.5% | 348620.25 | RTO Registration (Temp & perm.) | 20000.00 |
| RTO Registration (Temp & perm.) | 20000.00 | Comprehensive insurance | 70000.00 |
| Comprehensive insurance | 70000.00 | Inspection & 6 days training of 2 persons | 22000.00 |
| Inspection & 6 days training of 2 persons | 22000.00 | GST @28% | 754424.22 |
| Chassis- TATA 1613/42 697 TCIC BSIV TILT SLCAB | 1978926.00 | Chassis- TATA 1613/42 697 TCIC BSIV TILT SLCAB | 1978926.00 |
| Total Equipment + Chassis Grand Total (Rounded off) | 5021918.00 | Total Equipment + Chassis Grand Total (Rounded off) | 5427722.00 |

उपरोक्तप्रमाणे वस्तु व सेवा कर अमलात आल्यानंतर 01 नग सक्शन कम जेटींग मशिनचे दर रु. 54,27,722/- इतके आहे.

सदर दर पुर्वीचा मजुंर दर रु. 50,21,918/- पेक्षा 8.07% दराणे जास्त आहे. परंतु प्राकलणीय प्राकलणीय दर रु. 56,70,000/- पेक्षा 4.27% टक्के कमी आहे.

करीता गांधीबाग झोनकरीता 01 नग सक्शन कम जेटींग मशिन मे. काम अविदा ईन्वायरो प्रा. ली. पुणे., याचांकडुण रु. 54,27,722/- राशीत खरेदी करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 132ः— हिंगणा ''टी'' पॉईंट ते नागोबा मंदिर, संभाजी नगर {लोककर्म विभाग} चौकापर्यन्त मलवाहिकेच्या कामास्तव प्राप्त निविदांपैकी मे. अभि इंजिनीयरींग कॉरपोरेशन प्रा.लि. यांची प्राकलनिय दरापेक्षा ०.९९९ % ने कमीवर असलेली रू. १२,०६,९९,५४५/— (बारा करोड, सहा लक्ष, नव्वयान्नव हजार, पाचशे पंचेचाळीस फक्त) रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 133ः— हिंगणा ''टी'' पॉईंट ते सहकार नगर घाट पर्यन्त पावसाळी {लोककर्म विभाग} नालीचे कामास्तव प्राप्त निविदांपैकी मे. अभि इंजिनीयरींग कॉरपोरेशन प्रा. लि. यांची प्राकलनिय दरापेक्षा ५.५१ % ने कमीवर असलेली रू. २१,१७,६५,५७१/— (एकविस करोड, सतरा लक्ष, पासष्ठ हजार, पाचशे एकाहत्तर फक्त) रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 134 :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर